६९८/२०

३०३०

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ६९८/२० (९२७)

ग्रंथ नाम विश्वकर्मा महात्म्य.

विषय माहात्म्य.

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

महात्म्य.

विश्व ऊर्मी महात्म्य.

इतेश्वरं पद्म पौराणं भूखंडे ॥

स्कंदे पुराणे ॥ विश्व ऊर्मी महात्म्ये

सह्याद्री निरूपणा रंओ नाम श

अध्याय

वाचन हे वाढवन पुरा. (ग्रंथ क

रोकडे से.

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

शिरोयंत्रींत्रिकोणस्थान ॥ त्यांतआपणबिंदुतोतूंजी ॥ ४१ ॥ ऐसियासद्गुरूप्रणवमूर्ती ॥ ब्रह्मानंदसरस्वती ॥ तुझीज्याला पूर्णस्थिती ॥ प्राप्तनिश्चितीब्राह्मणह्मणिजे ॥ ४२ ॥ प्रणवाचेंनेणेंविवरण ॥ आडनामेंतोब्राह्मण ॥ गायत्रीचाचौथाचरण ॥ प्रणवविवरणकरितांजोडे ॥ ४३ ॥ चौथियाचरणाविणेंबापुडी ॥ नचलेगायत्रीलंगडी ॥ सद्गुरुकृपाहोतांरोकडी ॥ प्राप्तीध डपुडीचौथियाचरणीं ॥ ४४ ॥ शूद्रवैश्यक्षत्रीब्राह्मण ॥ गायत्रीचेचारिहेचरण ॥ तीनीजपतांमुख्यएकाविण ॥ ब्राह्मणपण आतुडेकैसें ॥ ४५ ॥ ॥ पदशूद्रवाणीऊरुस्थान ॥ बाहुक्षत्रीमुखब्राह्मण ॥ मुख्यमुखाविणेंहेंत्रिस्थान ॥ जपतांब्राह्मणहो इजेकैसें ॥ ४६ ॥ सहस्रशीर्षापुरुषाचेंवदन ॥ प्रणवब्राह्मणजन्मस्थान ॥ तयामुख्याविणेंहेंत्रिस्थान ॥ जपतांब्राह्मणहोइ जेकैसें ॥ ४७ ॥ चरणारभ्यमस्तकांत ॥ ध्येयध्यानस्तवनशास्त्रोक्त ॥ ध्यानानयेतांमस्तकतेथ ॥ ध्यातांअपघातध्यानींमानीं ॥ ४८ ॥ शिरेंविणपुरुषाचेंधड ॥ प्रेतामाजिहीअतिद्वाड ॥ तेवींत्रिपदागायत्रीकर्मकांड ॥ अमंगळअतुंडज्ञानेंविना ॥ ४९ ॥ त्याचिज्ञानाचेंजन्मस्थान ॥ प्रणवगायत्रीचतुश्चरण ॥ प्रणवज्ञानेंविनासंपूर्ण ॥ ब्राह्मणपणनयेआंगा ॥ ५० ॥ वर्णब्राह्मी अंत्यजाकडे ॥ प्रणवज्ञानेंब्रह्मत्वजोडे ॥ व्यासवसिष्ठायेंव्हडे ॥ ज्ञानेंरोकडेऋषेश्वरकेले ॥ ५१ ॥ यास्तवनरोटेंघेऊनि हातीं ॥ ज्ञानार्थअंत्यजवाड्याप्रती ॥ भीकमागणेउत्तमास्थिती ॥ मूर्खत्वेंवस्तीद्विजदेहींनको ॥ ५२ ॥ ज्ञानप्रमाणवर्णअप्र माण ॥ ऐसेंवेदांतगर्जेहांकमारून ॥ तयानिजात्मज्ञानेंविणसंपूर्ण ॥ भूषणतेंदूषणपुरुषासी ॥ ५३ ॥ ऐश्वर्यवोळगेजयेजा ती ॥ नृपत्वकरीतेथेंचिवस्ती ॥ करंटाभिक्षामागेद्विजाती ॥ ब्रह्मस्थितिसज्ञानीतैसी ॥ ५४ ॥ विनाज्ञानेंऐश्वर्यचांग ॥ ते दुःखरूपशवाचेभोग ॥ ज्ञानेंश्वर्यभोगअभंग ॥ तोहोस्वभोगउपेक्षीभिक्षु ॥ ५५ ॥ सज्ञानहोकांजातिहीण ॥ ब्रह्मत्वतय

रिघेशरण ॥ जात्यग्रआणीज्ञानेंहीण ॥ तोलोकींब्राह्मणआडनामें ॥ ५६ ॥ सुराचार्यनिरक्षरी ॥ कुबेरनामाभिक्षाहारी ॥
इंद्ररंकाचीसेवाकरी ॥ ब्राह्मणनामधारीमूढतैसा ॥ ५७ विधवाआणिसावित्रीनाम्नी ॥ लक्ष्मीयालीकुगृहींपाणी ॥ वडसने
त्रीहरिणेक्षणी ॥ तेवींअन्यथाज्ञानीब्राह्मणनामा ॥ ५८ ॥ ओमित्येकाक्षरंब्रह्म ॥ ऐसाप्रणववर्णोत्तम ॥ तयाप्रणवज्ञानेंवि
णेंअकृत्रिम ॥ ब्राह्मणनामनयेपुरुषा ॥ ५९ ॥ तोतूंसद्गुरूप्रणवज्ञानी ॥ प्रणवरूपियाकैवल्यदानी ॥ पंचवदनपूर्वोक्तलक्ष
णी ॥ शिवसांबउन्मनीशक्तियुक्त ॥ ६० ॥ पंचभूतसृष्टीचेंकारण ॥ परीपंचत्वारहितअकारण ॥ तुझेंस्वरूपनित्यनिर्गुण ॥
निगमाअविज्ञानिर्धारिता ॥ ६१ ॥ तरिस्वसंप्रदायउचितें ॥ आणिविश्वहेंतुझेंकर्मनिश्चितें ॥ ह्मणोनिआह्मींह्मणतसोंतुतें ॥
श्रुतिशास्त्रार्थेंविश्वकर्मा ॥ ६२ ॥ येथश्रोतेघेतीलअशंका ॥ निर्गुणीविश्वकर्मत्वअवांका ॥ कैसेंनिघडेताद्विषयींऐका ॥ परि
हारनिकाबोलिजेल ॥ ६३ ॥ स्वरूपांवरीनिर्गुणी ॥ उमटतीजीवेश्वराचियावाणी ॥ तेथीलकीजेउपलक्षणी ॥ अनुभवेंच
कीं ॥ ६४ ॥ ऐसेविवेकाचासागरु ॥ मुकुंदराजमुनेश्वरु ॥ वदलाआहेहेंउत्तरु ॥ श्रोतेसर्वत्रपरिसती ॥ ६५ ॥ येणेउत्तरें
निर्गुणी ॥ ब्रह्मैवाहंउमटतीवाणी ॥ तेचिजीवेश्वरह्मणावेदोन्ही ॥ त्याचीकरणीविश्वहेंसर्व ॥ ६६ ॥ ब्रह्मैववाणिईश्वराची॥
अहंवाणिहेजीवाची ॥ तयाउभयापासूनविश्वाची ॥ जाणिजेयाचीरचनाजाली ॥ ६७ ॥ राजाज्ञेनेंकार्यनिर्मिलें ॥ तेंनक
रितांहातेंरायेंचकेलें ॥ येणेंदृष्टांतेंलक्षितांपहिलें ॥ निर्गुणीलागलेंविश्वकर्मत्व ॥ ६८ ॥ असोहेंव्याख्यानपुढेंग्रंथी ॥ वि
स्तारेंकथिजेलपरिसिजेश्रोतीं ॥ हेग्रंथारंभीश्रीगुरुस्तुती ॥ प्रणवसंवित्तिवर्णिलीअसे ॥ ६९ ॥ ग्रंथनिर्माणींश्रीगुरुस्तवन
सकलसिद्धीचेंआदिकारण ॥ येणेवक्ताकर्ताग्रंथलेखन ॥ सद्गुरूआपणस्वयेंहोय ॥ ७० ॥ मजग्रंथनिर्माणींप्रीतिथोडी ॥

(3)

परीसद्गुरूस्तवनींप्रीतिगाढी ॥ ग्रंथलेखनींचढल्याआवडी ॥ स्तवीनरोकडीश्रीगुरुमूर्ति ॥ ७१ ॥ कन्याआणिलीमायघरा
तींसिदळणाचाकायदरारा ॥ परिगीतिगावयामातापितरा ॥ दळणपसाराप्रेमेंघाली ॥ ७२ ॥ तेवींश्रीगुरुवर्येंस्वरूपविश्रां
ती ॥ मातेंआणिलेंसुभावसंपत्ती ॥ संसारसासरेंत्यजऊननिश्चिती ॥ माहेराप्रतीमायबापें ॥ ७३ ॥ लक्षचौऱ्यासीजाचणी
टोलेबहुतांचेसोडवूनि ॥ स्वरूपमाहेराजनकजननी ॥ मजविश्रांतिदानीआणिताजाला ॥ ७४ ॥ पावल्यांस्वरूपमायघर ॥
ग्रंथादिकाव्येंकाढणेंकेर ॥ मजनलगेचिपरिसाचार ॥ यामिसेंमाहेरगावयाकाढी ॥ ७५ ॥ मायघरींचेंदळणकांडणें ॥ क
रितांमातेंसुप्रीतवाणें ॥ तेथेंहीमाझ्यासहायाकारणें ॥ भाउजायावाणीधांवतीसिद्धी ॥ ७६ ॥ गीर्वाणभाषाग्रंथगौरव ॥ प्रा
कृतेंबोलूंबैसतांसर्व ॥ प्राकाम्यासिद्धिअतीअपूर्व ॥ प्रज्ञावैभवपुरवीमज ॥ ७७ ॥ असोसंसारसासुरेंजाच ॥ जेणेंनिवारिलाहा
काच ॥ तोसद्गुरूमायबापसाच ॥ व्यालीअहाचसंसारिकें ॥ ७८ ॥ जननीजनकेंव्यालीकोडें ॥ तेहेंकर्मांगअत्यंतकुडें ॥ सद्गुरू
मायबापेंनिवाडें ॥ केलेंरोकडेंस्वसेवेसरतें ॥ ७९ ॥ स्वसेवेसरतेंकेलेंअंग ॥ अंगीकर्मेंनिपजतीचांग ॥ तीहींस्वसेवाभागप्रसंगें
सांग ॥ माझिंगुरूलिंगेंआंगीकारो ॥ ८० ॥ अंगीककर्मेंकोणकोण ॥ ज्ञानेंद्रियकर्मेंद्रियेंमिळून ॥ जींजींवितीघितीसंपूर्ण ॥
तींस्वसेवेआपणसद्गुरूलावो ॥ ८१ ॥ श्रोत्रींस्वभाविकऐकल्यावाणी ॥ लेखोस्वपुण्यकीर्तिश्रवणी ॥ त्वचास्पर्शेंवस्तुश्रेणी ॥
त्यास्वालिंगनींसरत्याकरो ॥ ८२ ॥ चक्षूच्याआडळीपडे ॥ तेस्वरूपइक्षणीलिखोकोडें ॥ जिव्हाचाखेतेंनिवाडें ॥ नैवेद्यींपडेऐसें
करो ॥ ८३ ॥ नानासुमनसुगंधावाणी ॥ आडळतागंधलेखोघ्राणी ॥ एवंचित्करणपंचसंचरणी ॥ तन्मात्राग्रहणीग्राही
कहोगुरू ॥ ८४ ॥ वाचाव्यापारस्वभाविक ॥ स्वस्तोत्रींलेखोगुरूनाथ ॥ जेजेंकरीतीमाझेहस्तक ॥ तेंकर्मसम्यकपूजाह्मणो ॥

॥ ८५ ॥ पदद्वयाचियासंचरणा ॥ स्वामीभावोस्वप्रदक्षणा ॥ दोनिकर्मैंघडतीशिश्ना ॥ तीहीस्वभजनासरतीकरो ॥ ८६ ॥
देवमज्जनाचेंसांचेपाणी ॥ नित्यनुसपिंतांउठेघाणी ॥ तैसीमूत्रशंकाआपुलीहेन्हाणी ॥ उसपणीवाणीलिखिजेदेवें ॥ ८७ ॥
रतिभोगमागेस्वकांता ॥ द्रोहघडेतोतियेनदेतां ॥ हेंअसोदेवतीर्थदेवाच्याभक्ता ॥ नेदींह्मणतांकोणगती ॥ ८८ ॥ असोआणी
कएकउपपत्ती ॥ भर्तृहरीमहानृपती ॥ वदलाआहेवेदोक्तनीती ॥ तोएकसंमतींलिहितोंश्लोक ॥ ८९ ॥ वांछासज्जनसंग
मेपरगुणेप्रीतिर्गुरौनम्रता ॥ विद्यायांव्यसनंस्वयोषितिरतिर्लोकापवादाद्भयं ॥ भक्तिःशूलिनिशक्तिरात्मदमनेसंसर्गमुक्तिः
खलेष्वेतेयेषुवसंतिनिर्मलगुणास्तेभ्योनरेभ्योनमः ॥ टी॰ ॥ संगकरावासज्जनाचा ॥ ऐसीउत्पन्नव्हावीवांछा ॥ ग्राहीकहोणे
परगुणाचा ॥ कायावाचामनेंशुद्ध ॥ ९० ॥ सद्गुरूच्यागर्जनतर्जनी ॥ त्रासविषादनमानितांदोन्ही ॥ नित्यसेवेसिनम्रत्वेंमनीं
तदाज्ञाअनुलंघनीवर्तावें ॥ ९१ ॥ प्रज्ञाफळसमृद्धिभारें ॥ वृक्षाऐसेंलवावेंनिबरें ॥ गुरुभजनकीजेआदरें ॥ लक्षणतीसरेंअ
सावेंहें ॥ ९२ ॥ सकळविद्येचीस्वामिणी ॥ अध्यात्मविद्याचक्रपाणी ॥ अपुलीप्रतिमाऐसेंगणी ॥ तिचियाअभ्यसनींअसो
व्यसन ॥ ९३ ॥ कामेच्छाअंतरींउपजे ॥ तेस्वकांतेसींपूर्णकीजे ॥ परस्त्रीसहसानालिंगिजे ॥ अत्यंतभीजेलोकापवादा ॥ ९४ ॥
भक्तिअसावीशंकरीदृढ ॥ मनोदमनींघालिजेहोड ॥ दुष्टसंसर्गींविटविजेचाड ॥ ऐसाप्रवाडनृदेहींकीजे ॥ ९५ ॥ हेनवगुणीनव
रत्नमाळा ॥ विमळविलसेज्याचियागळा ॥ तयापुरुषाचियाचरणकमळा ॥ वेळोवेळाप्रणिपातुअसो ॥ ९६ ॥ येथेंश्लोकार्थ
संपला ॥ असोकिंनिमित्तबोलिला ॥ कांतेसींस्वकामसंपादिला ॥ तोनीतीनेंघातलादेवभजनीं ॥ ९७ ॥ देवालयींमाजलाकेर ॥ ४
झाडूनटाकिजेनिरंतर ॥ देवासेवाचतेसाचार ॥ गुदेंद्रियव्यापारहातैसा ॥ ९८ ॥ एवंअंगीकइंद्रियांचेंकर्म ॥ माझेंसद्गुरूपुरुषो

त्तम ॥ स्वसेवेवारीं पूर्णकाम ॥ आत्मारामअंगिकारो ॥ ९९ ॥ असोप्रस्तुतमाझीसेवा ॥ ग्रंथलेखनींसद्गुरूदेवा ॥ अंगिकारावीस मर्थेंतुवां ॥ पूर्णकरावानिर्विघ्नग्रंथ ॥ १०० ॥ ग्रंथलेखनींविघ्नेंफार ॥ छळितीह्मणोनिकवेश्वर ॥ आधीप्रार्थितीविघ्नहर ॥ माझा विघ्नौघहरसद्गुरूस्वामी ॥ १०१ ॥ स्वरूपविस्मरणमहाविघ्न ॥ कोहंभावेंझगटलेपूर्ण ॥ तेमागुतीदिधलेंसोहंस्मरण ॥ तोमहा विघ्नघ्नसद्गुरूमाझा ॥ २ ॥ त्याच्यापदाब्जींठेऊनिशिर ॥ मागेनग्रंथनिर्विघ्नतावर ॥ करूनित्यालानरकुंजर ॥ तद्रुपेंस्तोत्रक रूंआतां ॥ ३ ॥ इतिश्रीपद्मपुराणे ॥ भूखंडग्रंथींमंगळाचरणे ॥ स्कंदोत्पत्तीमाजिगहने ॥ माहात्म्यपावनाविश्वकर्माजोत्याचें ॥ ॥ ४ ॥ इतिश्रीपाद्मेभूखंडेस्कंदोत्पत्तौविश्वकर्ममाहात्म्ये ॥ प्रथमोध्यायः ॥ १ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥


the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratis

॥ इति प्रथमोध्यायः समाप्तः ॥

(8)

इति प्रथमोध्याय समाप्त:

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(२)

अथ द्वितीयोध्याय प्रारंभः

"Joint project of Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

श्रीमन्महागणाधिपतयेनमः ॥ ॐनमोसद्गुरूश्रीगणेशा ॥ विद्याश्रीयुक्ताभक्तगणईशा ॥ ब्रह्मनरांगाआनंदगजास्या ॥ नरगज
वेषाब्रह्मानंदा ॥ १ ॥ अपूर्वहेंतुझेंगणेशपण ॥ भक्तगणईशत्वसंपूर्ण ॥ पावेतुजविणेंऐसाकोण ॥ ब्रह्मादिसुरगणवृंदींअसे ॥ २
भक्तांचींसंकटेंमोठीं ॥ धावयासरसींजोनिवटी ॥ भक्तगणईशत्वसृष्टी ॥ पावेजगजेठीतोचिएक ॥ ३ ॥ गजेंद्राचानक्रपाश ॥ जेणें
छेदिलानिर्विशेष ॥ तोचिजगद्गुरूपरमपुरुष ॥ भक्तगणईशपुरुषोत्तम ॥ ४ ॥ कौरवलक्षणमहाविघ्न ॥ द्रौपदीचेंपरिहरण ॥ जेणें
केलेंतोनारायण ॥ विघ्नौघ्नहरणजगद्गुरू ॥ ५ ॥ अवमानूनिदुर्वासातें ॥ स्वभक्तगर्भवासविघ्नातें ॥ स्वयेंस्विकारिलेंजेंनिरुतें ॥ त्या
भक्तविघ्नांतकातेंप्रणिपात ॥ ६ ॥ असोइत्यादिभक्तसंकट गणा ॥ हरावयासामर्थ्यदेवगणा ॥ माजिवरिष्ठाअसेकोणा ॥ श्रीगु
रुगजाननावांचूनी ॥ ७ ॥ ग्रंथारंभींगणपतिस्तवन ॥ करितांग्रंथनिर्विघ्नपूर्ण ॥ संपादेहेंतुझेंवरदान ॥ कृपाकरूनमजदेयीं ॥ ८
ग्रंथारण्यघोरपंथ ॥ लंघूनपावावयानिभ्रांत ॥ ग्रंथपरपारपुरप्रांत ॥ मजदेसाद्यंतत्वत्कृपावर ॥ ९ ॥ अपारग्रंथअकूपार ॥
विघ्नौघश्वापदींपूर्णोदर ॥ याचापाववींपैलपार ॥ कर्णधारेंद्रगुरुगणेश ॥ १० ॥ मुनीशमनमूषकासना ॥ एकात्मभावएकदश
ना ॥ वादिवैक्लव्यविद्यावसना ॥ चिद्रत्नरशनाआवृतसत्कटा ॥ ११ ॥ मुक्तिचतुष्टयसायुधा ॥ धर्मचतुष्टयभुजावृंदा ॥ प्रकृती
पुरुषपदारविंदा ॥ ब्रह्मानंदामंगळमूर्ती ॥ १२ ॥ अयागमनशून्यस्थाना ॥ सहिततोडरआंदुचरणा ॥ पतीतपूतमुखरोत्पन्ना ॥
वांकीभूषणान्वितसत्पदा ॥ १६ ॥ ऋद्धिसिद्धीस्वरूपघुंगुरा ॥ वळीपाळितपदोदारा ॥ पदांगुलिकानखरमुकुरा ॥ अनंतांबरध
राप्रतिबिंबिता ॥ १४ ॥ ध्वजवज्रांकुशऊर्ध्वरेखा ॥ सपद्मपंचपदतळांका ॥ सहितपदेंसहस्रमुखा ॥ वर्णितांशंकामनींबाधी ॥
॥ १५ ॥ आत्मनिवेदनेंभक्तराज ॥ करूनपावलेपदतळींराज्य ॥ तिहींभवारिविजयीलाविलाध्वज ॥ तोचिसतेजपदतळींशोभे ॥ १
॥ १६ ॥ भक्तपापपर्वताविदळी ॥ तेचिदंभोलीश्रीपदातळीं ॥ स्वजनमनमतंगावळी ॥ वळीतोतळींअंकुशपदा ॥ १७ ॥ ऊर्ध्वग

तिप्रदायका ॥ तेचिपदतळींऊर्ध्वरेखा ॥ शिराब्जभक्ताचेंअमायिका ॥ पदाब्जींदेखाअब्जत्वेंजडलें ॥ १८ ॥ असोश्रीयंत्रामाजि
त्रिकोण ॥ तैशागुल्फींशोभलेचरण ॥ सरलजानुपोठरियापूर्ण ॥ स्वभक्तमनवक्रताहरिती ॥ १९ ॥ निगमगुह्यगुह्याचेंस्थळ ॥
सूक्ष्मासूक्ष्मकटिमंडळ ॥ भवभीतिभीतांनाभीकेवळ ॥ अखंडअचळनाभिप्रदा ॥ २० ॥ अनंतकोटीअजांडाधारा ॥ देखिला
उदरींतुझ्याधीरा ॥ ऐसियासद्गुरूलंबोदरा ॥ चिदंबरधरादोंदिला ॥ २१ ॥ हृदयावकाशीअसंख्यभक्त ॥ उडुगणेंस्थापिलीं
निभ्रांत ॥ तेवीहृत्पद्मपदकींतेंलखलखीत ॥ सत्वसुश्वेतहीरकाकारें ॥ २२ ॥ तुझ्यामुक्तीचाआखंडसोहळा ॥ भोगावयाअसं
ख्यभक्तगळा ॥ पडिलेतद्रुपमुक्तमाळा ॥ शोभतीसोज्वळांकंठींतुझ्या ॥ २६ ॥ धर्मार्थकाममोक्षाप्रती ॥ कीर्तीज्याज्याशरण
येती ॥ तिहींकीर्तिवदनींविराजती ॥ धर्मवर्गाकृतभुजातुझिया ॥ २४ ॥ वीर्यशौर्यगांभीर्यधैर्य ॥ इहींकंकणीतवपाणिवर्य ॥ क
ळावियाशोभतीअरिवर्य ॥ षट्कासमात्सर्यनिर्दळूनि ॥ २५ ॥ धर्मार्थकाममोक्षदायका ॥ गुर्वर्चनांगमुद्राचोखा ॥ चतुष्करक
रांगुलिका ॥ चिद्रत्नझळकाझळकाविती ॥ २६ ॥ भक्तभावार्थमूदमोदक ॥ स्वानंदशुंडेंझेलिसीचोख ॥ अवचटेंदेखतीतुझेंमु
ख ॥ त्यासिभवदुःखआतळेना ॥ २७ ॥ वेदांतश्रवणेंसुमंगळ ॥ विशाळश्रवणअवधानशीळ ॥ तेथनित्यानित्यपरिक्षाविमळ ॥
कुंडलेंसोज्वळअनुभवाचीं ॥ २८ ॥ ज्ञानविज्ञानगंडस्थळ ॥ दर्पणद्वयींबिंबलींविमळ ॥ अनुभवरत्नाचींविशाळ ॥ चिद्व्रंडांशमं
डळप्रभकुंडलें ॥ २९ ॥ गंडस्थलोन्मदकीर्तिद्रुती ॥ गिवसीतमुमुक्षुभ्रमरयेती ॥ त्यातूंसंतोषिसस्विरूपतृप्ती ॥ भक्तगणपतीगु
रुवर्या ॥ ३० ॥ श्रवणसंधीतन्मयाकारें ॥ कर्णोत्पलेंअतिसुंदरें ॥ सहिताष्टभावअष्टांशचंद्रें ॥ शोभेसाजिरेंप्रबोधभाळ ॥ ३१ ॥
शुद्धसात्विकअहंकारें ॥ ब्रह्माहमस्मीस्फुरणोद्गारें ॥ बोधसूक्ष्मभेदभरें ॥ कुंभार्द्धद्वयाकारेंस्फुरताजाला ॥ ३२ ॥ तेंचिमस्तकीं
कुंभस्छळ ॥ शुद्धसात्विकभावेंसोज्वळ ॥ तेथेंबिंबलेंनभसुनिळ ॥ गगनोज्वळतेणेंभासें ॥ ३३ ॥ ऐसियापरमानंदमुखावरी ॥

निस्त्रैगुण्यअवस्थेशिरीं ॥ लोकसंग्रहार्थगुरुविघ्नारी ॥ निगमाज्ञाधारिमुगुटस्थळीं ॥ ३४ ॥ तेथविधींचीवोपिलीविमळें ॥ सुशी
ळसाणेलाविलींविपुळें ॥ निर्दोषतेआलींसोज्वळें ॥ तींकर्मैंप्रांजळेंरत्नेंकेलीं ॥ ३५ ॥ अविरळकर्मरत्नींनिर्दुष्ट ॥ वेदाज्ञामुगुट
लखलखाट ॥ पाठींभजनकरावोखट ॥ शोभेसदाटभूतात्मध्वजीं ॥ ३६ ॥ वेदाज्ञेवरीसद्गुरूआज्ञा ॥ मुकुटमणीचीलाहेसंज्ञा ॥
जेंवेदींवंदिजेमस्तकींसूज्ञा ॥ निस्त्रैगुण्यावर्महेंकळे ॥ ३७ ॥ वेदरूपियानारायण ॥ वेदाज्ञाह्मणिजेत्याचेंवचन ॥ तेणेंनाराय
णेंहीआपण ॥ स्वगुरुवचनवंदिजेशिरीं ॥ ३८ ॥ यदर्थींप्रमाणउत्तर ॥ कपिलमहामुनेश्वर ॥ वदलाआहेतेंसादर ॥ अशंकाहरप
रिसावें ॥ ३९ ॥ श्लोक ॥ आदौगुरुः शिवः पश्चान्नारायणः शिवात्तथा ॥ नारायणाद्विधिर्ज्ञात्वाततः सप्तर्षयश्चते ॥ टी॰ ॥
आदिगुरुह्मणावाशिव ॥ शिवापासूनकेशव ॥ केशवापासूनस्वयंभुदेव ॥ स्वरूपानुभवपावला ॥ ॥ ४० ॥ ब्रम्ह्यापासूनसप्त
ऋषी ॥ पावतेजालेस्वरूपासी ॥ सप्तर्षींचेंउपदेशी ॥ जालेअठ्याशीसहस्त्रतेहो ॥ ४१ ॥ इतिश्लोकार्थ ॥ असोहायेथेंउपदेशक्र
म ॥ निरोपिजेकायकाम ॥ शिवाज्ञावाहेपुरुषोत्तम ॥ तदाज्ञानिगमवहातिशिरीं ॥ ४२ ॥ ह्मणूनिनिगमाज्ञामुकुटस्थानी ॥ पुरु
षोत्तमाचंबिाणल्यावाणी ॥ शिवाज्ञाकीजेमुकुटमणी ॥ परीतेवचनींअनिर्वाच्य ॥ ४३ ॥ श्लोक ॥ भगवद्वाक्य ॥ त्रैगुण्यवि
षयावेदानिस्त्रैगुण्योभवार्जुन ॥ टी॰ ॥ श्रीकृष्णह्मणेगाअर्जुना ॥ माझीगुणत्रयरूपवेदाज्ञा ॥ शिरींवंदुनिनिस्त्रैगुण्या ॥ मद्गु
रूअज्ञारूपहोतूं ॥ ४४ ॥ ऐसेंबोलिलानारायण ॥ ह्मणोनिशिवाज्ञानिस्त्रैगुण्य ॥ मुकुटमणीस्थानीपूर्ण ॥ वर्णितांदूषणनयेव
चना ॥ ४५ ॥ एवंशिवाज्ञानिस्त्रैगुण्या ॥ मुकुटमणित्वपावलीसंज्ञा ॥ माझागुरुगणपयावचन ॥ ग्रंथरचनाज्ञाउचिताआला ॥
४६ ॥ उचितेंबोललागुरुदयाघन ॥ गणेशरूपेंऐकतांस्तवन ॥ विश्वकर्माशिवसनातन ॥ वरदोक्तिजीवनवर्षताजाला ॥ ४७ ॥
ब्रह्मानंदगजानन ॥ संतोषोनिप्रसन्नवदन ॥ ह्मणेवत्सापुरेस्तवन ॥ ग्रंथलेखनममाज्ञाकरी ॥ ४८ ॥ स्तवनवाणीदूर्वांकुरीं ॥ पु

जिलासातागुरुविद्यारी ॥ विरागशिंदुरलिप्तचिद्गात्री ॥ प्रसन्नोत्तरींतुष्टलाबोले ॥ ४९ ॥ अघाडियाचेंएकपत्र ॥ तैसेंअर्पिलेंकृत
स्तोत्र ॥ तेणेंभक्तगणइच्छासत्र ॥ प्रसन्नवक्त्रवरघेह्मणे ॥ ५० ॥ खाद्यनैवेद्यासमान ॥ आर्षमतीनेंकेलेंस्तवन ॥ अर्पितांगुरुगजान
न ॥ प्रसन्नवदनवरघेह्मणे ५१ माझीअसंकटचतुर्थी ॥ भक्तिस्विकारूनमंगळमूर्ति ग्रंथरचनासंकटनिवृत्ती ॥ भक्तगणपतीवरघे
ह्मणे ॥ ५२ ॥ ह्मणेसद्गुरूविघ्नौघहरण ॥ पुरेवत्साआतांस्तवन ॥ ममाज्ञाकरीग्रंथलेखन ॥ पूर्णनिर्विघ्नकर्तामीहोय ५३ सत्कर्मी
प्रवर्तनकरितां ॥ विघ्ननातळेमाझ्याभक्ता ॥ हीमाझीप्रतिज्ञातत्वतां ॥ साचसर्वथाकरणेंमज ॥ ५४ ॥ तथापिसत्कर्माकडे ॥ अ
वचटेंमोहरविघ्नाचीपडे ॥ तेम्यांअंगेंनिवारणेंघडे ॥ नपडेसांकडेंभक्तासि ॥ ५५ ॥ भक्तसत्कर्मीप्रवर्तेभोजें ॥ तेंमीलेखींभजनमा
झें ॥ न्यूनपूर्णभजनींजेंजें ॥ ममांगींवाजेतेंसर्व ॥ ५६ ॥ हाग्रंथनव्हेयेणेंव्याजें ॥ तुवांअरंभिलेंभजनमाझें ॥ ग्रंथअवरोधहीये
वेंलाजे ॥ ग्रंथलिहिजेपरोपकारा ५७ प्रशंसेचीचाडधरी ॥ तेणेंव्याजेंग्रंथकरी ॥ तेथेंमीसाहायतानकरीं ॥ परोपकारींप्राणीभ
जें ५८ हेंचिमाझेंप्रतिज्ञोत्तर ॥ भक्तसहयींमीशंकर ॥ तुतेंदेतांघेहावर ॥ ग्रंथपरपारपावविन ५९ ऐसेंसद्गुरुअनुवादतां ॥ तत्प
दींप्रणामजालोंकरितां ॥ तवंऊठहोह्मणेग्रंथालिहितां ॥ प्रभकरमाथाठेउन ॥ ६० ॥ तवंएकनवलवर्तलेंतेथ ॥ मद्रूपेंस्ताविलासद्गु
रूनाथ ॥ ह्मणोनिप्रत्यक्षऋद्धिसिद्धिचाकांत ॥ हर्षेंगणनाथपावताजाला ॥ ६१ ॥ भाद्रपदींशुद्धचतुर्थी ॥ ग्रंथारंभींएकोंनिस्तुती
प्रत्यक्षपावलामंगळमूर्ती ॥ तद्रूपेंमातीपूजिजेतेदिवसी ॥ ६२ ॥ घराआलानरकुंजर ॥ विघ्नौघजंबुकिमृगेश्वर ॥ घेउनिऋद्धिसि
द्धिचासंभार ॥ पूजासादरघ्यावयामाझी ॥ ६३ ॥ ह्मणेंभक्ताभलाभला ॥ ज्याच्यामीनिर्मीपाउला ॥ तोत्वांसद्गुरूमद्रूपेंस्तविला
मानदिधलाइतुकामज ॥ ६४ ॥ सद्गुरूह्मणिजेविश्वकर्मा ॥ एकलें कर्मतेणेंआह्मा ॥ सांगींतलेंकरणेंभक्तोत्तमा ॥ मीतत्प्रतिमाका
यपावें ॥ ६५ ॥ सद्गुरूचालाहूनिवर ॥ मीहाजालोंविघ्नेश्वर ॥ संसारविघ्नकरूनिचूर ॥ स्वरूपादातारमीनोहें ॥ ६६ ॥ गुरूकृपे

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(12)

नेंमत्कोपवारें ॥ मत्कृपागुरुकोपनवारे ॥ गुरुवरापुढेंमाझीयावरें ॥ उचितकिंकरेंकायदिजे॥६७॥ मीलाह्मूनिसद्गुरूवरा ॥ पूज्य
जालोंसुरासुरा ॥ माझावरनमानेंधरिा ॥ गुरुश्रीवराबोललेतया ॥६८॥ माझेंनकरितांपूजन ॥ गुरुपूजनेंमीतृप्तपूर्ण ॥ अज
न्मागुरूमरणशून्य ॥ मीत्याआधीनदोहींवर्ते ॥६९॥ गजास्यह्मणेसांगुबुधा ॥ मीहाजन्मपावलोंकदा ॥ कोणेएकेसमयीयु
द्धा ॥ गजासुरवधागेलाशंभू ॥७०॥ मागेंमज्जनालागिजगज्जननी ॥ प्रवेशलीअभ्यंगसदनी ॥ अभ्यंगीअंगउद्वर्तनी ॥ निघाली
रजनीमुष्टिएक ॥७१॥ तेणेंमुष्टिमानहरिद्रापंके ॥ मातेंस्वलीलाअमृतहस्तें ॥ निर्मुनिअंबाखांबुकींदेखे ॥ तवंमीस्वमुखेंटाहोक
री ॥७२॥ माझाऐकतांजन्मटाहो ॥ माझ्याजननीसिउपजलामोहो ॥ मीहोवोसंगाघेवूनिपाहो ॥ स्तनपानलाहोदीधलामज
७३ सवेंचस्वइत्छाप्रौढकेलें ॥ मजमहाद्वारींप्रतिष्ठिलें ॥ हातींदंडदेवूनअज्ञापिलें ॥ ग्रहींममाझेवेगळेंनसोडीकोणा ॥७४॥ मा
तेंठेवूनमंदिरद्वारीं ॥ माताप्रवेशलीमज्जनवोवरी ॥ तवंगजास्यसहितगजचर्मधारी ॥ पावलाद्वारींत्रयंबक ॥७५॥ मींनेणोंपित
याचीखूण ॥ दांडेंवारिलात्रिलोचन ॥ ह्मणेंममांबाअज्ञेविनातूंकोण ॥ प्रवेशूंसदनह्मणासिराहा ॥७६॥ असुरसंहारिसकोपरुद्र
प्रवेशूंनदेतांसदनद्वार ॥ स्वशस्त्रेंछेदूनमाझेंशिर ॥ निजमंदिरप्रवेशला ॥७७॥ आलाजाणूनत्रिपुरारी ॥ गजबजूनाहिमाद्रीपुत्री
मज्जनअंगेंसुचैलकरि ॥ वेष्टितमंदिरींपावलीवेगें ॥ ७८ ॥ कुरलांबुबिंदुगळतधरणी ॥ मंदिरींआलीसुवर्णवर्णी ॥ तवअंबुकींदे
खिलागजास्यपाणीं ॥ धावूनचरणींलागलीतदा ॥७९॥ कुरलांबुसिंचनेंतेणेंपूर्ण ॥ सहजहोतांचरणक्षालण ॥ शंभूह्मणेगौरी
प्रसन्न ॥ श्रमोपहरणपावलोंमाग ॥८०॥ असोमागेनह्मणेगौरी ॥ पुत्ररक्षणठेविलाद्वारीं ॥ तोकांआणिलानाहींघरीं ॥ आ
पणमंदिरींप्रवेशतां ॥८१॥ शंभूह्मणेकैंचापुत्र ॥ मातेंप्रवेशूंनदेतांद्वार ॥ कोपेंम्यांत्याचेंशरीर ॥ अशिरीकरूनठेविलेंद्वारीं ॥
॥८२॥ अंबाह्मणेआधींत्यातें ॥ सशिरीकरूनदेइजेमातें ॥ हेंचिमागीतलेंम्यांतुह्मातें ॥ प्राणनाथेंकृपाकीजे ॥८३॥ ऐसेंबोल

13

तांभवानी॥ कृपेनेंद्रवला शूलपाणी॥ गजास्यकरीहोतेंतत्क्षणी॥ मद्गलस्थानींलाविताजाला॥ ८४॥ सशिरींकरूनशंकरें॥ कु
रवाळूनअमृतकरें॥ सजीवकेलेंतवकृपाकरें॥ अंबाघेस्वकरेंकडियेमज॥ ८५॥ कढियेघेवूनजगन्माता॥ ह्मणेबारेहातुझा
पिता॥ ह्मणूनदावीविश्वनाथा॥ तत्पदींमाथाशिववूनिमाझा॥ ८६॥ मातेंशतपत्रलोचना॥ कढेचाअंकींत्रिलोचना॥ देऊन
माझीजन्मरचना॥ वचनसूचनाकथितीजाली॥ ८७॥ गौरीमुखेंपुत्रोत्पत्ती॥ ऐकूनशंभूअपर्णापती॥ संतोषोनस्वपुत्राप्रती
वरेंअतिप्रीतीअर्पिताजाला ८८ तुझेंनामगजानन॥ ऐसेंजल्पोअगजानन॥ माझेंसहितभृगुजानन॥ दनुजाननासहदेवउ
द्या॥ ८९॥ विद्यारंभींविवाहारंभीं॥ आवाहारंभींनिर्वाहारंभीं॥ इत्यादिसर्वशुभावहारंभीं॥ सर्वारंभींतुंपूज्यहो॥ ९०॥ तुझें
नकरितांपूजन॥ पूर्वोक्तकार्येंकरावयाजन॥ जायतेथेंतत्कार्यभंजन॥ विघ्नेंसृजूनमींकरीं॥ ९१॥ आणिशिवविश्वकर्माविनाय
क॥ त्याचेंतुंयेनामएक॥ ऐसापितामाझात्र्यंबक॥ स्पर्शूनिमस्तकवरदेमज॥ ९२॥ ऐसेंदेवूनिवरदान॥ पुन्हाह्मणेवृषभास
न॥ मद्भक्तकरितीमाझेंभजन॥ तेथआवाहननकरितांतूजा ९३ एवंभक्तासहवरदान॥ माझेंकथिलेंजन्मकथन॥ जन्मतेथेंअ
चूकमरण॥ मीत्याअधीनदोहीवर्ते॥ ९४॥ ऐकूनगणपतीचेंवचन॥ स्याघातलेंलोटांगण॥ देवासिकैंचेंजन्ममरण॥ ह्मणूनि
चरणदृढधरिले ९५ भक्तजडजनजन्ममरण॥ हरणावतारगजानन॥ माझासद्गुरूतूंकरुणाघन॥ चातकदीनअत्यंततेंमी ९६
अक्षयपूर्णकळाचंद्र॥ तोतूंमीअतिचकोर॥ भक्तजनकरुणासागर॥ तूंमीलघुतरमीनतेथें॥ ९७॥ चिदांभतूंमीमूढकमळ॥
सत्कंजतूंमींअंधालिबाल॥ क्षमाधात्रींकल्पांतअढळ॥ तूंमीमूत्रमळत्यागिलाजनी ९८ असोतूंसद्गुरूनिर्विकार॥ ब्रंह्मानंदप
रात्पर॥ तुवांनिजजन्मकथाविस्तार॥ कथिलातोसमग्रामिथ्याभूत ९९ चिच्छक्तिअंबास्वरूपकेवळ॥ अनंगातेथकैंचामळ॥ सू
र्यअस्ततारजनीमूळ॥ दिवामूळसूर्योदय १० जेथेंसूर्यचंद्रनातारा॥ जलआग्निवायूअंबरधरा॥ ठावोचिनाहीयाविस्तारा॥

तोतूंदातारानिष्प्रपंच १ तुंवांनकरूनकेलेंहेंविश्व ॥ तोतूंविश्वकर्मानिर्मायाशिव ॥ केलेंरक्षावयास्वरूपींसर्व ॥ नानाहावभाव
धरिसीस्वामी ॥ २ ॥ अनंतपुण्येंतुझेचरण ॥ देखिलेआतांनसोडीपूर्ण ॥ ऐसेंअनुवादतांगजानन ॥ करुणानिधानतुष्टलावचने
॥ ३ ॥ तुष्टलाकरिवक्रकायकरी ॥ माझेंशिरोब्जउभयकरीं ॥ स्वपदींचेंउचलूनलोकरीं ॥ हृदयींचहूकरींधरिताजाला ॥ ४ ॥
हृदयींचेंनसोडितांपूर्ण ॥ ह्मणेभक्तामीतुष्टमान ॥ तुंवांआदरिलेंग्रंथलेखन ॥ तेंमीकरीननिजहस्तें ५ देवेंद्रवंद्यइतुकाशब्द
वदोनमायारूपभेद ॥ लोपूनिमूळस्वरूपशुद्ध ॥ ब्रह्मानंदस्वयेंजाला ६ तेंचिदाखवूनकौतुकपूर्ण ॥ सोडिताजालाआलिंग
न ॥ तवंमीनपाहेंगजानन ॥ पाहेसंपूर्णब्रह्मानंद ॥ ७ ॥ तैसाचमस्तकठेवितांचरणीं ॥ स्वामीउठविआश्वासूनि ॥ ह्मणेमी
होतोंपदार्थदानी ॥ तूंग्रंथलेखनींसादर ॥ ८ ॥ करूनवागेश्वरीचीप्रार्थना ॥ प्रार्थीअंबासद्वर्तना ॥ घेयींसज्जनआशिर्वचना
ग्रंथार्थरचनासूचनाहेतु ॥ ९ ॥ श्रवणसुखाचेंसुधाकर ॥ त्याचाघेयींअभयकर ॥ तेणेंग्रंथाक्षरचकोरनिकर ॥ देतीढेंकरअ
र्थतृप्तीचे ॥ १० ॥ कवीशापूजावेसादरें ॥ ज्यातेंपूजिलेंदामोदरें ॥ तेणेंप्रेम यपूर्णवर्णोदरें ॥ तुंदिलसुंदरेंवोवियातुळिती ११
मंगळमूर्तिसद्गुरूनाथा ॥ मंगळारंभीप्रार्थिलेंसाता ॥ मंगलपाणिठेऊनमाथा ॥ दिधलाग्रंथार्थामंगलवर ॥ १२ ॥ ग्रंथरचनासंप्र
दाय ॥ सांगुनसद्गुरूश्रीआचार्य ॥ हृदयालयिंसदयहृदय ॥ माझ्याचित्कायवर्तताजाला ॥ १३ ॥ तुकयाहृदयींब्रह्मानंद ॥ ब्र
ह्मानंदपदारविंद ॥ कोशींकोशस्छभक्तिमकरंद ॥ तुकाषट्पदसेवीतवर्ते ॥ १४ ॥ विश्वकर्मवंशावतंस ॥ कश्यपकश्यपाद्रिस
द्वंश ॥ विस्तारविस्तारीज्ञानहंस ॥ मनुनागेशशर्मामुनी ॥ १५ ॥ नागेशमुनीजेष्ठपुत्र ॥ बालागर्भसंभूतगात्र ॥ आबालवृ
द्धकृपापात्र ॥ तुकासर्वत्रलोकाचें ॥ १३ ॥ विश्वकर्ममाहात्म्यग्रंथ ॥ तेणेआरंभिलापरमाद्भुत ॥ कृपाकरूनसाधुसंत ॥ ग्रंथ
समाप्तकरोतुहा ॥ ११७ ॥ इतिश्री॰ ॥ भू॰ ॥ स्कं॰ ॥ विश्व॰ ॥ मंगला॰ ॥ गणपतिरूपेण आचार्यस्तवोनाम द्वितीयाध्यायः ॥

पान क्र. ४५५ उपलब्ध नाहित

15

कार ॥ पुन्हास्वरूपसाक्षात्कार ॥ संतींसत्वरबोधिलातुम्ही ॥ ३० ॥ पावूंस्वरूपसाक्षात्कार ॥ म्याकांनसावेंनिरुत्तर ॥
परिलिहावयातुमचेउपकार ॥ नपुरेभूपत्रहेंतुम्हींकेलें ॥ ३१ ॥ निर्गुणापरिसतुमचेगुण ॥ गातांवाटेसमाधान ॥ परिय
दर्थीघाताअतिअविघ्न ॥ कल्पायूपूर्णनकेलेंआम्हा ॥ ३२ ॥ जन्मघेवूनकल्पकोटी ॥ संतउपकारलिहितांसृष्टी ॥ धरत्री
नपुरेपत्रासाटीं ॥ थोडींसिवटींऔषधीपत्रें ॥ ३३ ॥ असोऐसेंतुम्हीसंतकृपानिधी ॥ आपुलीकृपाशब्दसमृद्धि ॥ ग्रंथहाऐ
कणेंकृपाबुद्धि ॥ हेंनलगेत्रिशुद्धीप्रार्थणेंआह्मा ॥ ३४ ॥ सेतींबीजपेरिलेंजिहीं ॥ तयासेतेंघ्यापकिम्हणावेंकायी ॥ तेवीऐ
कणेंग्रंथतुम्हाहाही ॥ निजानिर्वाहींनिजानंदें ॥ ३५ ॥ विद्यासांगूनस्वशिष्यासि ॥ परोचाघेणेंतयापासीं ॥ माझीवक्तव्य
ताहेतैसी ॥ ऐकणेंसंतासितेणेंचिपाडे ॥ ३६ ॥ चूकिअडळतांथोडीगाढी ॥ सोसीनादीजेकानमुरडी ॥ मस्तकघातितोंपा
याबुडीं ॥ नपडोवोडिप्रभूच्याहाता ॥ ३७ ॥ सार्थकजालियापरौचाश्रवण ॥ तेणेंचिहस्तेंदीजिअभयदान ॥ म्हणोनिसं
तमूर्तीचेचरण ॥ स्वशिरींसंपूर्णवाहूंलवें ॥ ३८ तवकरुणाकरींवारिच्यावरी ॥ माझेंशिराब्जकरपुष्करीं ॥ झेलूनआलंगिलें
स्वहृदयावरी ॥ विजयिविजयोतरींसानुकंपीं ॥ ३९ ॥ मगसानुकंपसुधासागर ॥ म्हणतीसंतजगदीश्वर ॥ तुझीयेअभि
ष्टसिद्धीचादातार ॥ होविश्वंभरब्रन्हानंद ॥ ४० ॥ ब्रम्हानंदेंतुतेंयक्षेत्र ॥ करूनपेरणीकेलीबीजमंत्र ॥ तेथपीकसाठवणी
आम्हीश्रोत्र ॥ सांठेअंबरऐसेंकेलें ॥ ४१ ॥ ब्रम्हानंदेंतुतेंसत्पात्र ॥ करूनविद्याठेविलीपवित्र ॥ तयेविद्येचेसद्दुद्वार ॥
ऐकूसादरआम्हीजालों ॥ ४२ ॥ मीनजोविकासुजीवन ॥ चातकजीविकाजैसाघन ॥ चकोरजीविकाचंद्रमापूर्ण ॥ तैसेंस
च्छ्रवणजीविकाआह्मा ॥ ४३ ॥ तुम्हीविश्वींविश्वंभर ॥ संतश्रोतेकवीश्वर ॥ एकेंअंगेंतीनिव्यापार ॥ जग दुद्धाराना रेत्तेंतु

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

ह्मा ॥ ४४ ॥ कवित्वेंभगद्गुणकीर्तन ॥ वर्णग्रंथनेवर्णिजेपूर्ण ॥ श्रोतेहोवोनिकीजेश्रवण ॥ तदुक्ताचरणसंतत्वेंकीजे ॥ ४५ ॥
तेतुह्मीत्रिमूर्तिसंतअधोक्षज ॥ व्यासोक्तिमंदारसुमनसपूज्य ॥ तेथमद्वाक्यकनकपुष्पपुज्य ॥ तुह्मासत्याज्यआवडेकेवीं
॥ ४६ ॥ संतम्हणतीअधोक्षज ॥ पूज्यशंभूकैलासराजा ॥ त्याचींकनकपुष्पींकरावयापूजा ॥ गरुडध्वजाअतिप्रीती ४७
मंदारसुमनसुपूजित ॥ तोहीकनकपुष्पेंअपेक्षित ॥ पुजावयाआपुलेंकुळदैवत ॥ रमाकांतपुरुषोत्तम ॥ ४८ ॥ व्यासोक्तिस
घृतक्षीरीवरी ॥ तुझीसदुक्तिशर्कराबरी ॥ प्राकृतचूर्णिकाकोसिंबिरी ॥ अधिकग्रासभरिसेववितीरसा ॥ ४९ ॥ असोआ
म्हीश्रवणक्षुधातुर ॥ विस्तीर्णमांडिलेंअवधानपात्र ॥ वक्तव्यरसरससुमनोहर ॥ रसनाकरवोगरोतुझा ॥ ५० ॥ अभिष्ट
दैवतब्रम्हानंद ॥ ग्रंथकल्पनासंकल्पासिद्ध ॥ त्याचामस्तकींआसिर्वाद ॥ तुझ्यातूंसद्यआरंभीग्रंथ ॥ ५१ ॥ एवंसंतविश्वं
भर ॥ ग्रंथार्थदेतेजालेवर ॥ तेणेंतुकाहर्षनिर्भर ॥ ग्रंथसादरलिहिताझाला ॥ ५२ ॥ विश्वकर्मापरमेश्वर ॥ त्याचामनूमानस
पुत्र ॥ मनूचाकश्यपप्रजेश्वर ॥ तद्गोत्रीकर्मारनागेशशर्मा ॥ ५३ ॥ नागेशगर्भसमुत्पन्न ॥ तुकानामजेष्ठनंदन ॥ ब्रम्हानंदच
रणशरण ॥ ग्रंथव्याख्यानदत्ताचेत्त ॥ ५४ ॥ म्हणेतुकासंतप्रसादें ॥ विश्वकर्ममहात्म्यग्रंथपदें ॥ महाराष्ट्रभाषावोवियाछं
दें ॥ परिसिजेविषदेंविस्तारिजेती ॥ १५५ ॥ इतिश्रीपद्मपौराणे ॥ मूखंडेस्कंदोपत्तौ ॥ विश्वकर्ममाहात्मे ॥ मंगलाचरणे
संतांश्रोतृणां ॥ कवीनांप्रार्थनानामचतुर्थोध्यायः ॥ ४ ॥ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ॥ श्रीरस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥

अथ पंचमोऽध्याय आरंभः

" Joint project of Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

18

॥श्रीमन्महागणाधिपतयेनमः॥ श्रीशारदायैनमः॥ श्रीगुरुनाथायनमः॥ निर्विघ्नमस्तु ॥ ॐनमोसद्गुरूविश्वकर्मया॥
विश्वरूपानिरामया॥ ब्रह्मादिजीवातुझीमाया॥ निवारायाउमजनपडे ॥१ ॥ वार्द्धीवारिसीमाकिती॥ वारिचरेंचजेंअंकि
ती॥ ब्रह्मादिजीवरासीप्रती॥ मायापरमितीपैतेंतुझी॥ २॥ ब्रम्हादिमशकांतसंपूर्ण॥ जीवसृष्टीचेंकारण॥ अजामाया
जन्मस्छान॥ अजेचेंअन्वयपरमात्मातुं॥३ ॥ परमात्माचतूंअजन्मा॥ मायाभोक्तृत्वेंविश्वकर्मा॥ पावताहोसीजीवनामा
अजत्वसीमाअनुल्लंघित॥ ४॥ अजामायातुझीपूर्ण॥ प्रजालोहितशुक्लकृष्ण॥ व्यालीतुतेंनातळून ॥ उन्हींपरमात्मेप
णजीवत्वाआलें॥ ५ ॥ मायानामजळाधारें॥ मुख्यबिंबप्रतिबिंबाकारें॥ तुझेंपरमात्मत्वएकसरें॥ नहोनदूसरेंजीवत्वा
आलें॥ ६॥ तेथवेदादिंकापडिलाभ्रम॥ एकानेकानकळेवर्म॥ अकर्मयाआंगीलावूनकर्म॥ जीवहेंनामपरमात्मयादेती॥
७॥ मायाअभोक्तापरमात्मा॥मायाभोक्तातोजीवात्मा॥मायानामाचीहेगरिमा॥ करीजीवात्मापरमात्मया॥ ८॥ आहेप
णेंअतळेजळ॥तेथेंबिंबेशशिमंडळ॥नसुनमायाघालीआळ॥परमात्मयाकेवळजीवत्वाचा॥ ९॥ बिंबजळींप्रतिबिंबलें॥ तें
जैसेंनजालेंबोलें॥ तैसेंपरमात्मत्वमायामळें॥ जीवत्वापावलेंनाहींतुझें॥ १०॥ मृगबुद्धिटेकलेमृगोदकें॥मनबुद्धितेलटकें
तेविंअनात्मयामायाविलोके॥ निजात्मविवेकेंदेखत्यानाहीं॥ ११॥ निजात्मविवेकदर्शन॥ तुझीकृपानहोतापूर्ण॥ जगीं
मानवीलाहेकोण॥अत्मत्वाअगण्यपुण्यस्वीलाहे॥ १२॥निजात्मदर्शनीपुण्यस्वी॥ तुझियाकृपेचामानवी ॥ मान्यहोयब्र
ह्मादिदेविं॥ त्याचीपदवीपदवीनपवे॥ १३॥ ब्रह्मादवोनांपदवी॥ कवीनांअैसेंवेदस्तवी॥ शुक्रासमानज्ञानीतेकवी॥
त्याकवीसपदवीतोअतिवंद्य॥ १४॥ तयापदवीवृंदांतअतिश्रेष्ठ॥ त्वत्कृपापदींअतिवरिष्ठ॥ त्याचीपदवीपरमनिर्दुष्ठ॥

वोळेअक्षिष्टसद्भक्तातुझ्या ॥ १५ ॥ तुझियाकृपेंचेंमहिमान ॥ अनात्मयादेंनिजात्मज्ञान॥ तुझीकृपाजालियापूर्ण ॥ अपूर्णा
संपूर्णपदप्राप्ति ॥ १६ ॥ तोतूंनिर्मायपरमात्मा ॥ विश्वनिर्माणीविश्वकर्मा ॥ विश्वरूपश्रीविश्वात्मा ॥ तुतेंजीवात्माकल्पि
तीजीव ॥ १७ ॥ तूंजीवसृष्टीचेंकारण ॥ देवसृष्टीमाजीतूंमान्य ॥ तुझेंमहात्मआतिपावन ॥ पापनाशनसुपुण्यप्रद ॥ १८॥
नैमिषनाममहाअरण्य ॥ अगण्यऋषिवृंदसंपन्न ॥ तयाऋषिवृंदाप्रतिसंपूर्ण ॥ सूतपुण्यश्रवणकरवी ॥ १९ ॥ व्यासशि
ष्यमहाज्ञानी ॥ सूतनामामहामुनी ॥ ऋषिवृंदासिनैमिषारण्यीं ॥ पूण्यश्रवणींयोजितानित्य ॥ २० ॥ त्यापुण्यश्रवणामा
जिगहन ॥ तुझेंमाहात्म्यअतिपावन ॥ श्रुतिस्मृतिसंम्मताख्यान ॥ विश्वनिर्माणसमयींचें ॥ २१ ॥ सूतह्मणेऋषिवृंदाप्रती
विश्वकर्मापरमात्माअमूर्ति ॥ मूर्तित्वअवलंबूनिस्वशक्ति ॥ जगदुत्पत्तिकरिताझाला ॥ २२ ॥ जगदुत्पत्तिमहदाख्यान ॥
पुण्यश्रवणामाजीगहन ॥ गहनावधानेंकीजेश्रवण ॥ ऋषीतेंसंपूर्णह्मणेसूत ॥ २३ ॥ मोक्षश्रीसाधनसंपत्ती ॥ माजिवरि
ष्ठभगवद्भक्ती ॥ भगद्भक्तीमुख्यविरक्ती ॥ तैसीजगदुत्पतीपुराणश्रवणी ॥ २४ ॥ अध्यात्मविद्याविद्यापंक्ती॥ विद्यासंपन्नीं
विनयस्थिती ॥ विनयतायुक्तनिजात्मप्रतिती ॥ तैसीजगदुत्पत्तीपुराणश्रवणी ॥ २५ ॥ भूतमात्रींभगवद्भक्ती ॥ यानाव
अपरोक्षआत्मस्थिती ॥ अपरोक्षीअभेदभजनवृत्ती ॥ तैसीजगदुत्पत्तीपुराणश्रवणीं ॥ २६ ॥ सूतसनकादिकाऋषीप्रती ॥
ह्मणेनसतांजगदुत्पती ॥ वेदशास्त्रपुराणसंवित्ती ॥ कोणकोणाप्रतीउपदेशी ॥ २७ ॥ प्रजानहोतांस्वधर्मस्थिती ॥ पिता
प्रबोधीकोणाप्रती ॥ तेवींनसतांजगदुत्पत्ती ॥ श्रुतिस्मृतिपुराणेंकैंची ॥ २८ ॥ जगज्जनकपरमात्मा ॥ विश्वनिर्माणींविश्व
कर्मा ॥ विश्वअचारनियमसीमा ॥ स्वगिरानिरूपमानिर्मिताझाला ॥ २९ ॥ तेपरमात्मयाचीपरावाणी ॥ नादरूपेंवेदजन

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com